# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

**निवडणुक/ महत्वाचे** जा.क्र.रासनिप्रा/निवडणुकपारिश्रमिक/५८८/सन २०१४
दि२९/१०/२०१४

**वाचावे** :- १.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ नियम ७६ व ७७

**आदेश**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) नुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाचे गठन झालेले असुन सदर प्राधिकरणामार्फत सहकारी संस्थेच्या मंडळाच्या सदस्यांची सार्वत्रिक निवडणुका, नैमत्तिक रिक्त पदांसाठीची निवडणूक व पदाधिकाऱ्यांची निवडणुक घेणेचे अधिकार प्राधिकरणास आहेत.

राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका पार पाडण्याच्यादृष्टीने महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ४ मध्ये सहकारी संस्थांचे ‘अ’, ‘ब’, ‘क’ व ‘ड’ असे प्रकार करण्यात आलेले आहे. प्राधिकरणाने ‘ड’ वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात परीपत्रके, आदेश, मार्गदर्शनपर सुचना इ. निर्गमित केलेले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ७६ मध्ये ‘ड’ वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुका या त्या संस्थेच्या निवडणुक प्रयोजनासाठी बोलावलेल्या अधिमंडळाच्या विशेष बैठकीत व प्राधिकरणाने नियुक्ती दिलेल्या व्यक्तिच्या अध्यक्षतेखाली घेण्याची तरतुद आहे. संस्थेच्या निवडणुकीच्या संबंधात कर्तव्य पार पाडण्यासाठी अधिमंडळाच्या विशेष बैठकीचे प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करणेत आलेले व्यक्तींना मानधन व भत्ते देणे आवश्यक आहे. उक्त प्राधिकृत अधिकारी यांना मानधन व भत्ते निश्चित करणे गरजेचे आहे. तसेच या संस्थांचे निवडणुक निधी रक्कम निश्चित करणे गरजेचे आहे.

त्यास अनुसरुन राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास प्राप्त महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१३), महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम ३ (vi) आणि प्राधिकरणास याबाबत समर्थ करणारे सर्व अधिकारांचा वापर करुन खालील प्रमाणे निवडणुक निधी आणि मानधन / परिश्रमिक अनुज्ञेय राहील.

**'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी प्राधिकृत अधिकाऱ्यास द्यावयाचे मानधन/ परिश्रमिक व अंदाजित निवडणुक निधी खालीलप्रमाणे:**

**निवडणुक अविरोध झाल्यास :**

| अ.क्र. | प्राधिकृत अधिकाऱ्याची परिश्रमिक दर (रुपये) | अंदाजित निवडणुक निधी रुपये | |
|---|---|---|---|
| | | सभासद संख्या | निवडणुक निधी (रुपये) |
| १. | रु.५०० प्रती सहकारी उपसा जलसिंचन/ पाणीवापर संस्थांसाठी | २५ किंवा त्यापेक्षा कमी = | २५०० |
| २. | रु.७५०/- प्रती सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी | २६ ते ५० = | ४००० |
| ३. | रु.५००/- प्रती मजुर/ जंगल कामगार सहकारी संस्थांसाठी | ५१ ते १०० = | ५००० |
| | | १०१ ते १९९ = | ७५०० |

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे

अ) निवडणुक निधीची रक्कम संबंधित संस्थेने निवडणुकीपुर्वी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाचे बँक खातेत जमा करावी.

ब) मतदान झाल्यास प्राधिकृत अधिकारी परिश्रमिकाचे रकमेचे दुप्पट रक्कम मानधन म्हणुन अनुज्ञेय राहील.

क) ड वर्गातील संस्थांचे निवडणुकाबाबत जिल्हा / तालुका/ वॉर्ड सहकारी निवडणुक अधिकारी यांना मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

तसेच संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड झाल्यानंतर संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची निवडणुक घेणेसंबंधात महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ७७ मध्ये तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीनुसार ड वर्गातील संस्थेच्या समितीच्या सदस्यांच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत त्या प्रयोजनार्थ घेण्यात येणाऱ्या सभेमध्ये राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या (अध्यासी अधिकारी) अध्यक्षतेखाली होईल. त्यानुसार अशा पदाधिकारी निवडीच्या सभेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यास/ अध्यासी अधिकाऱ्यास मानधन / परिश्रमिक देणे गरजेचे असुन ते खालीलप्रमाणे अनुज्ञेय राहील.

**'ड' वर्गातील सहकारी संस्थांचे पदाधिकारी निवडणुकीसाठी प्रती संस्था अध्यासी अधिकाऱ्यास द्यावयाचे पारिश्रमिक :**

| अ.क्र. | तपशिल | दर (रुपये) |
|---|---|---|
| १. | अध्यासी अधिकारी | रु.२५०/- |

उपरोक्त आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करणेत यावी.

**सदर आदेश मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे आदेशानुसार देण्यात येत आहे.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

२९/१०/१४

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक
प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१. तालुका / वार्ड सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
२. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व).
३. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

२/- त्यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या निवडणुकीस पात्र सहकारी संस्थांच्या निदर्शनास आणावे.

**प्रत सस्नेह रवाना** :- १.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. संचालक, हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपुर
४. आयुक्त (दुग्ध विकास), महाराष्ट्र राज्य, अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई